राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य पुणे.
तळ मजला, जुनी मध्यवर्ती इमारत,पुणे ४११००१.

फोन नं.(०२०) २६०५०६४१ Email Id :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-१६/आस्था/ प्रतिनियुक्ती जाहिरात/ 03 /२०२१
दिनांक:- 04/ ०१/२०२१

प्रति,
मा. सहकार आयुक्त व निबंधक ,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

विषय - राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, राज्य घटनेतील ९७ व्या घटनादुरुस्तीच्या अनुषंगाने व सहकार कायदयातील तरतुदीप्रमाणे राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी शासनाने स्वतंत्र व स्वायत्त प्राधिकरणाचे गठन दि. ३०.०३.२०१३ रोजीच्या आदेशान्वये केलेले आहे. सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागाकडील शासन निर्णय दि.३१.१०.२०१३ त्यानुसार काही पदे प्रतिनियुक्तीने व काही पदे कंत्राटी तत्वावर भरणे करीता शासन निर्णय निर्गमित केलेला आहे त्यानुसार खालील पदे राज्य शासकीय कर्मचा-यांमधून प्रतिनियुक्तीने भरणा करावयाची आहेत

अ.क्र.	पदाचे नाव	वेतनश्रेणीचा तपशिल		पदसंख्या
		६ व्या वेतन आयोगानुसार	७ व्या वेतन आयोगानुसार	
१	उच्च श्रेणी लघुलेखक	पीबी २ रु.९३३० – ३४८०० ग्रेड वेतन ४४००	(एस १५) ४१८०० -१३२३००	१
२	सहाय्यक प्रशासकीय अधिकारी	पीबी २ रु.९३३० – ३४८०० ग्रेड वेतन ४३००	(एस १४) ३८६०० -१२२८००	५
३	लिपीक व टंकलेखक	पीबी २ रु ५२००- २०२०० ग्रेड वेतन १९००	(एस ६) १९९०० -६३२००	५

तरी इच्छुक व पात्र अधिकारी/ कर्मचारी यांच्याकडून अर्ज मागविण्यासाठी यासोबत जोडण्यात आलेली जाहिरात आपल्या www.sahakarayukt.com या संकेतस्थळावर अपलोड करावी ही विनंती

(वसंत पाटील)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
प्रतिनियुक्तीने पद भरती जाहिरात

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं. (०२०) २६०५०६४१ Email Id:- sceapune@gmail.com

दिनांक ३०/०३/२०१३ च्या अधिसुचनेव्दारे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाची पुणे येथे स्थापना करण्यात आली असुन खालील पदे **प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी** पात्र अधिकारी/ कर्मचा-यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

अ. क्र.	पदनाम	पद संख्या	वेतनश्रेणीचा तपशिल	
			६ व्या वेतन आयोगानुसार	७ व्या वेतन आयोगानुसार
१.	उच्च श्रेणी लघु लेखक	१	पीबी २ रु.९३३० — ३४८०० ग्रेड वेतन ४४००	(एस १५) ४१८०० -१३२३००
२.	सहाय्यक प्रशासकीय अधिकारी	५	पीबी २ रु.९३३० — ३४८०० ग्रेड वेतन ४३००	(एस १४) ३८६०० -१२२८००
३.	लिपीक व टंकलेखक	५	पीबी २ रु ५२००- २०२०० ग्रेड वेतन १९००	(एस ६) १९९०० -६३२००

उपरोक्त वेतनश्रेणीमध्ये राज्य शासनाच्या सेवेमध्ये असलेले व प्रतिनियुक्ती करीता पात्र असलेले अधिकारी/ कर्मचारी यांनी विहीत नमुन्यात अर्ज सादर करावेत. प्रतिनियुक्ती बाबतच्या अटी व शर्ती शासन निर्णय दि.१७/१२/२०१६ व दि.१६/०२/२०१८ नुसार व त्या श्रृखंलेतील वेळोवेळी जाहिर केलेले शासन निर्णयानुसार राहतील. अर्जाचा विहीत नमुना व अटी/शर्ती शासनाच्या Intranet या संकेतस्थळावर व मा. सहकार आयुकत व निबंधक सहकारी संस्था म.रा. पुणे यांच्या www.sahakarayukta.com या संकेतस्थळावर अपलोड केलेल्या आहेत. तसेच विहीत नमुना अर्ज व अटी/शर्तीची प्रत प्राधिकरणाच्या कार्यालयातही उपलब्ध आहेत. तरी इच्छुक कर्मचारी/अधिकारी यांनी अर्ज प्राधिकरणाच्या उपरोक्त पत्यावर / ईमेल वर सादर करावेत.

अटी व शर्ती -

१. प्रतिनियुक्ती प्रथमत: तीन वर्षाकरीता करण्यात येईल व संबधित अधिका-याची इच्छुकता व नियंत्रण विभागाचे आवश्यकतेनुसार दिलेला कालावधी कमाल ५ वर्षापर्यंत वाढविता येईल. विहीत केलेला कालावधी संपताच प्रतिनियुक्ती आपोआप संपुष्टात येईल व सदरचा कालावधी संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ अनुज्ञेय राहणार नाही.

२. उच्च श्रेणी लघुलेखक (एस १५) १३२३००- ४१८०० , सहाय्यक प्रशासकीयअधिकारी (एस १४) ३८६- ०० १२२८०० , कनिष्ठ लिपीक व टंकलेखक (एस ६) १९९०० -६३२०० या वेतनश्रेणीत कार्यरत असलेले शासनाच्या कोणत्याही विभागातील अधिकारी कर्मचारी / त्या त्या पदासाठी अर्ज करु शकतील.

३. प्रतिनियुक्तीवर पदस्थापनेसाठी पदग्रहण अवधी हा शासनाने या संदर्भात वेळोवेळी केलेल्या नियमानुसार अनुज्ञेय राहील.

४. प्रतिनियुक्तीवर सेवा घेणा-या कार्यालयास काही विशिष्ट कारणास्तव विहित कालावधी संपण्यापूर्वी प्रतिनियुक्तीवर आलेल्या अधिका-यास त्याच्या मूळ प्रशासकीय विभागास / कार्यालयाकडे परत पाठवणे आवश्यक असल्यास, त्या आस्थापनेवरील सक्षम प्राधिका-याने तसे समर्थनीय कारण स्पष्ट करुन त्याला/ परत पाठवण्यासाठी यथास्थिती संबंधित प्रशासकीय विभागास / कार्यालयास तीन महिन्यांची पूर्वसूचना (नोटीस) देणे आवश्यक राहील. तथापि, या संदर्भात विशिष्ट कारणे नमूद करुन उदा. अनियमितता, अफरातफर, कर्तव्यच्युती, इ. कारणे नमूद करुन प्रतिनियुक्तीचा कालावधी तात्काळ संपुष्टात आणता येईल.

५. आदेशात विहित केलेला प्रतिनियुक्तीचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वीच अधिकारी/ कर्मचारी स्वत:हून मूळ प्रशासकीय विभागात / कार्यालयात परत जाण्यास इच्छुक असल्यास त्याने समर्थनीय कारण स्पष्ट करुन त्यासाठी किमान तीन महिन्यांची पूर्वसूचना (नोटीस) यथास्थिती दोन्ही प्रशासकीय विभागास/ कार्यालयास देणे आवश्यक राहील. अशा परिस्थितीत त्याच्या विनंतीवरुन प्रतिनियुक्ती संपुष्टात आणण्याचा निर्णय प्रतिनियुक्तीच्या आस्थापनेवरील कार्यालयातील सक्षम प्राधिका-याने घेतल्यास, सदर कर्मचा-याच्या पूर्ण सेवाकाळात अनुज्ञेय एकूण १० वर्षाच्या प्रतिनियुक्ती कालावधीतून आदेशात विहित केलेला प्रतिनियुक्तीचा कालावधी त्याने उपभोगल्याचे समजण्यात येईल.

६. ज्या अधिकारी/कर्मचा-या विरुध्द भ्रष्टाचार / लाचलुचपत गुन्हयासंदर्भातील प्रकरणे, फौजदारी प्रकरणे/ महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अंतर्गत नियम ८ खाली विभागीय चौकशी सुरु आहे अथवा शिक्षेची अंमलबजाणी चालू आहे त्यांनी अर्ज करु नयेत.

७. अर्ज सादर करण्याची मुदत जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवस राहील.

८. इच्छुक अधिकारी / कर्मचारी जाहिरातीत नमुद केलेल्या विहीत मुदतीत अर्ज सादर करु शकतील. तसेच त्याबाबतची हार्ड कॉपी प्राधिकरणाकडे समक्ष अथवा पोस्टाव्दारे पाठविण्यात यावी.

या शिवाय सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि.१७.१२.२०१६ व दि.१६.२.२०१८ व शृंखलेतील वेळोवेळी निर्गमीत केलेल्या शासन निर्णयातील अटी व शर्ती लागू राहतील

प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी अर्जदारांनी करावयाचा अर्जाचा नमुना (प्रपत्र -१)

अ.क्र.	मुददा	तपशील/अभिप्राय
१.	संपूर्ण नाव	
२.	कार्यालयाचे पूर्ण नाव	
३.	पद व वेतनश्रेणी – c. सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे d. सातव्या वेतन आयोगाप्रमाणे	
४.	जन्म दिनांक	
५.	शैक्षणिक अर्हता	
६.	भ्रमणध्वनी क्रमांक	
७.	सध्याचे पद व त्यावरील नियुक्तीचा दिनांक	
८.	सेवानिवृत्तीचा दिनांक	
९.	मागील ५ वर्षाचे गोपनीय अहवालाच्या प्रती	

१०.	मत्ता व दायित्व सादर केलेली आहे का ?	
११.	पदोन्नतीच्या विचारक्षेत्रात आहे का	
१२.	वयाच्या ५०/५५ व्या वर्षी पुर्नविलोकन केले आहे का ? (लागू असल्यास)	
१३.	मागील वेळी प्रतिनियुक्ती करण्यात आली किंवा कसे	
१४.	विभागीय चौकशी प्रस्तावित आहे किंवा कसे याचा तपशील	
१५.	प्रतिनियुक्तीकरीता निवड झाल्यास विभाग कार्यमुक्त करेल किंवा कसे ?	

(अर्जदाराची सही)